## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : ४०व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय चाचणी (एम. सेट) परीक्षेचे आयोजन रविवार,दि. १५जून रोजी विविध सात केंद्रांवर करण्यात आले आहे.

ही परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या मार्फत जळगाव केंद्रावर आयोजित केली आहे. या परीक्षेरीता जळगाव शहरातील खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय परिसरातील परीक्षा केंद्र स्वामी विवेकानंद भवन -अ (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०१), स्वामी विवेकानंद भवन -ब (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०२) , स्वामी विवेकानंद भवन -क (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०३) , शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केंद्र सांकेतांक -१४०४), के.सी.ई. ए.टी. झांबरे माध्य. महाविद्यालय (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०५), खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर (आयएमआर) (केंद्र सांकेतांक -१४०६), खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय (केंद्र सांकेतांक -१४०७) या सात केंद्रावर सेट परीक्षा घेण्यात येणार असून या परीक्षेकरीता २९३६ विद्यार्थी विविध विषयांकरीता प्रविष्ट होणार आहे. असे ४० वी सेट परीक्षा संपर्क व्यक्ती तथा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी कळविले आहे.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १३ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता